सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २४७ | शनिवार, दि. ३० मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com



## आशियाई बास्केटबॉल स्पर्धेसाठी अमळनेरच्या सोनलची पंच म्हणून निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रीलंकेतील कोलंबो येथे सुरू असलेल्या १८ वर्षांखालील पुरुष व महिला साबा पात्रता आशियाई बास्केटबॉल स्पर्धेसाठी अमळनेरच्या कु. सोनल वाल्मिक हटकर हिची पंच म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तिच्या या निवडीमुळे अमळनेरसह जळगाव जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि. २५ ते २९ मे २०२६ दरम्यान सुगथादासा इनडोअर स्टेडियम, कोलंबो येथे ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा होत आहे. कु. सोनल हटकर ही जैन स्पोर्ट्स अकादमी, जळगावची खेळाडू असून के.सी.ई. सोसायटीच्या व्ही. पी. होले शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल महासंघ (फिबा) व भारतीय बास्केटबॉल महासंघ यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटनेचे सचिव गोविंद मुथ्थुकुमार यांच्याकडे नियुक्तीपत्र पाठविण्यात आले. सोनलच्या निवडीबद्दल जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, जैन स्पोर्ट्सचे अध्यक्ष अतुल जैन, जिल्हा क्रीडाधिकारी जगदीश चौधरी, क्रीडा समन्वयक अरविंद देशपांडे, प्रा. आकाश बिवाल, प्रा. यशवंत देसले, रविंद्र धर्माधिकारी, अमळनेर येथील एन. टी. मुंदडा ग्लोबल स्कूलचे चेअरमन प्रकाश मुंदडा, प्राचार्य लक्ष्मण तसेच क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले.

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५१५००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १४०१००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११६५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २६१०/-
भाव प्रती १० ग्राम

**आजचे अभीष्टचिंतन**





**श्री. संदीप बापू पाटील**
माजी सभापती-पंचायत समिती



**श्री. संभाजी बापू पाटील**
अमळनेर



**श्री. राजेंद्र महाजन**
अमळनेर





झाडे माणसांनाच नव्हे तर पशू पक्षी प्राणी सर्वांनाच उपयुक्त आहे. म्हणूनच झाडे लावा झाडे जगवा.

### धुळे-जळगाव रेल्वे

## नरडाणा बायपासने कनेक्टिव्हिटी वाढणार!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : धुळे-जळगाव दरम्यान थेट रेल्वे संपर्क प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने नरडाणा स्थानकाजवळ बायपास मार्ग उभारण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आला असून, यामुळे खान्देशच्या विकासाला नवी दिशा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जळगावच्या खासदार स्मितताई वाघ यांनी पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक रामश्रय पांडे यांच्यासोबत नुकतीच अमळनेरमध्ये प्रवासी सुविधांसह प्रस्तावित रेल्वे मार्गाबाबत सविस्तर चर्चा केली.

पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक रामश्रय पांडे अमळनेर रेल्वे स्थानकाला भेट देत 'अमृत भारत स्टेशन' योजनेंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी रेल्वे प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत स्थानक परिसराचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अमळनेर रेल्वे स्थानकाचा वाढता प्रवासी प्रतिसाद लक्षात घेता स्थानकावर आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. प्रवाशांसाठी प्रतीक्षालयांची उभारणी, स्वच्छतागृहांची सुधारणा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, दिव्यांगांसाठी विशेष व्यवस्था, पार्किंग क्षेत्राचा विस्तार, प्रकाशयोजना आणि सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. स्थानक परिसराचे सुशोभीकरण करून रेल्वे प्रवाशांना अधिक चांगला अनुभव मिळावा यासाठी प्रशासनाकडून विविध कामे वेगाने सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.यावेळी खासदार स्मितताई वाघ यांनी अमळनेर रेल्वे स्थानकावर अधिकाधिक एक्स्प्रेस गाड्यांना थांबा देण्याची मागणी प्रशासनाकडे केली. खान्देशातील प्रवाशांना मुंबई, पुणे, सुरत, अहमदाबाद तसेच मध्य भारतातील शहरांशी अधिक वेगवान संपर्क मिळण्यासाठी रेल्वे सुविधा वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. अनेक महत्त्वाच्या गाड्यांना अमळनेर येथे थांबा नसल्यामुळे प्रवाशांना गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याचेही त्यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. व्यापारी, शेतकरी आणि लघुउद्योगांसाठी महत्त्वाची असलेली पार्सल सेवा दीर्घकाळापासून बंद असल्याने स्थानिक पातळीवर नाराजी व्यक्त होत होती. या पार्श्वभूमीवर पार्सल सेवा तातडीने पुन्हा सुरू करण्याबाबत रेल्वे प्रशासनासोबत सकारात्मक चर्चा झाली. पार्सल सेवा सुरू झाल्यास अन्नधान्य, भाजीपाला, फळे तसेच विविध औद्योगिक वस्तूंची वाहतूक सुलभ होणार असून स्थानिक व्यापाराला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.





## 'प्रताप'च्या सात विद्यार्थ्यांची पोलीस दलात निवड



शितल पाटील



चेतन पाटील



कार्तिक पाटील




रोहित कुंभार



समाधान कुंभार



उमेश कुंभार



अजय कोळी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खान्देश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयातील करिअर काउन्सेलिंग सेंटर (सीसीएमसी)च्या सात विद्यार्थ्यांची मुंबई शहर पोलीस दलात निवड झाली आहे. ही निवड यादी २७ मे रोजी रात्री १०.३० वाजता जाहीर करण्यात आली.

**निवड झालेले विद्यार्थी :**

१) शितल पाटील २) चेतन पाटील ३) कार्तिक पाटील ४) रोहित कुंभार ५) समाधान कुंभार ६) उमेश कुंभार ७) अजय कोळी

उपरोक्त सर्व विद्यार्थी सीसीएमसी विभागाचे नियमित विद्यार्थी होते. विभागामार्फत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षा, १५ दिवसीय मार्गदर्शन वर्ग आणि राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धांचा त्यांना मोठा लाभ झाला. विशेष म्हणजे, अमळगाव येथील वीटभट्टीवर मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबातील विद्यार्थ्यांनी पोलीस दलात स्थान मिळविल्याने समाधान आणि आनंद व्यक्त केला जात आहे.

या यशाबद्दल खान्देश शिक्षण मंडळाचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, उपाध्यक्ष माधुरीताई पाटील, कमल कोचर, विश्वस्त वसुंधराताई लांडगे, कार्याध्यक्ष सीए नीरज अग्रवाल, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन यांच्यासह सर्व संचालक, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले

## लग्नसमारंभासाठी अमळनेरला आलेले वृद्ध बेपत्ता

### पोलिसांत हरवल्याची नोंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : शहादा तालुक्यातील मंदाने येथील रहिवासी काळू तानका बोरसे (वय ७५) हे अमळनेर शहरातून बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून याप्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. या घटनेमुळे कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, काळू तानका बोरसे हे दि. १० मे रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास मंदाने येथून गावातील काही नागरिकांसोबत अमळनेर शहरातील

पान २ वर

## पालिकेची वाहिनी फोडणारे प्लंबर, कर्मचाऱ्यांसह आदेश देऊनही गुन्हा दाखल न करणाऱ्यांवर कारवाई

### मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या भूमिकेचे अमळनेरकरांकडून स्वागत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेच्या गांधली येथील जलशुद्धीकरण केंद्रावरून वाहिनी फोडून बेकायदेशीर नळ कनेक्शन काढणाऱ्या खासगी व पालिकेच्या प्लंबरसह त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यास नकार देणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी घेतलेल्या या कठोर भूमिकेचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.

यासंदर्भात गांधलीतील जलशुद्धीकरण केंद्रावरील सुपरवायझर बारकू कृष्णा सोनवणे यांनी फिर्याद दिली, की ६ एप्रिल रोजी दुपारी दीडच्या सुमारास जलकुंभाच्या मुख्य आऊटलेटमधून शासकीय परवानगीशिवाय कोणतीही पावती न फाडता मंजुरी न घेता एक इंची नळ कनेक्शन काढून पालिकेच्या मालमत्तेचे नुकसान व पाणी चोरण्याचा प्रकार निदर्शनास आला. अधिक चौकशी केली असता खासगी प्लंबर जावेद कमरोद्दीन शेख व पालिकेचे कर्मचारी कमरोद्दीन शेख हुसेन दोन्ही राहणार मेहतर कॉलनी यांनी हा प्रकार केल्याचे निदर्शनास आले. मुख्याधिकारी शिंदे यांना हा प्रकार कळताच त्यांनी तत्परतेने राजेंद्र काशीनाथ हडपे (रा. अयोध्यानगर) यांना संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. मात्र, हडपे यांनी गुन्हा दाखल करण्यास नकार देत टाळाटाळ केली. त्यामुळे मुख्याधिकारी शिंदे यांनी कर्तव्य तत्परता दाखवत हडपे यांच्याविरुद्ध देखील गुन्हा दाखल करण्याबाबत बारकू सोनवणे यांना आदेश दिले. जावेद आणि कमरोद्दीन यांच्याविरुद्ध शासकीय पाणीपुरवठ्यात अडथळा आणणे, चोरी करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तर राजेंद्र हडपे यांच्याविरुद्ध वरिष्ठांच्या आदेशाचा अवमान केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. हवालदार गणेश पाटील पुढील तपास करीत आहेत.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

### दिनविशेष
३० मे

- जालियनवाला बाग हत्याकांडाच्या निषेधार्थ रवींद्रनाथ टागोरांनी सर ही पदवी परत केली.
- मुंबई नभोवाणी केंद्राची सुरुवात.
- गोव्याला राज्याचा दर्जा मिळाला.
- पु. ल. देशपांडे यांना त्रिदल' संस्थेच्या वतीने पुण्यभूषण पुरस्कार प्रदान.

**शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के प्रवेश प्रक्रियेला अमळनेरात उत्स्फूर्त प्रतिसाद**

पान २ वर

## अहिल्यादेवीकालीन पायविहिरी व बारवांची होणार गणना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्ह्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या काळात निर्माण झालेल्या पायविहिरी, बारव तसेच इतर पुरातन वास्तूंचे जतन, संवर्धन व विकास करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात येणार आहे. या संदर्भात अप्पर जिल्हाधिकारी श्रीमंत हरकर साहेब यांच्यासोबत विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची सकारात्मक चर्चा पार पडली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी भारतभर लोक कल्याणकारी कामे केली. त्यात सर्व जाती-धर्मांसाठी त्यांनी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला. त्या ऐतिहासिक वारसा चा आजही आपण लाभ घेत आहोत. त्यामुळे बैठकीत जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी अहिल्यादेवी होळकर यांच्या काळातील पुरातन वास्तूंची गणना करण्यात यावी, त्यांची माहिती संकलित करून संवर्धनासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात यावा, याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच या ऐतिहासिक वास्तू पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावरही भर देण्यात आला. पर्यटनाला चालना मिळून ग्रामीण जीवन वृद्धिंगत करण्यासाठी याची मदत होईल. तसेच त्यांचे कार्य जनमानसात पोहोचवण्यासाठी उपयुक्त ठरेल.यावेळी नायब तहसीलदार सुनील समदाने, डी. ए. धनगर, अरुण ठाकरे, प्रभाकर न्हाळदे, तुळशीराम सोनवणे, संतोष कचरे, उमेश काटे (सचिव, शिवशाही फाउंडेशन), प्रकाश भिका पाटील (मंगरूळ), पांडुरंग शालिक पवार तसेच विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या ऐतिहासिक वारशाचे जतन करणे ही काळाची गरज असल्याचे सांगत, प्रशासनाने या उपक्रमासाठी सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले. भावी पिढीला पायाभूत काम करण्यासाठी प्रेरणा मिळेल अशा स्वरुपाचे काम केल्याने माणूस अजरामर होतो असा विश्वास निर्माण होईल. विशेष म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी हे सर्व कार्य सरकारी परीक्षा दोन न करता स्वतःच्या खाजगी दौलतीतून केले याचा अभिमान सर्वसामान्य जनतेला असेल.






अमळनेर : अप्पर जिल्हाधिकारी श्रीमंत हरकर यांना निवेदन देताना नायब तहसीलदार सुनील समदाने, डी. ए. धनगर, अरुण ठाकरे, प्रभाकर न्हाळदे, तुळशीराम सोनवणे, संतोष कचरे, उमेश काटे (सचिव, शिवशाही फाउंडेशन), प्रकाश भिका पाटील (मंगरूळ), पांडुरंग शालिक पवार

## संपादकीय

### धंदा है पर गंधा है यह..



वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष पदवी प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता तथा प्रवेश परीक्षा अर्थात 'नीट–यूजी' या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेला पाय फुटून तिचा प्रवास जवळपास देशभरात झाल्याचे स्पष्ट झालेच आहे. पण प्रकरणाचे कवित्व इतक्यात संपणारे नाही.पेपरफुटीच्या या जाळ्याचे मूळ धागेदोरे बिहार वा राजस्थानपेक्षाही महाराष्ट्रातील एका प्रसिद्ध शिकवणी वर्गापर्यंत पोहोचत असल्याचे केंद्रीय अन्वेषण विभागाचा (सीबीआय) अगदी ताजा तपास सांगतो. तपासातून होणारा उलगडा शिकवणी वर्ग व शिक्षकांची नैतिकता, पालकांची आणि समाजाचीही 'पैसा द्या, करिअर विकत घ्या' ही मानसिकता आणि हे दिसत असताना काहीही न करणार्या यंत्रणा यांबद्दल अनेक प्रश्न उपस्थित करणारा आहे. शिकवणी वर्ग हा त्यातील महत्त्वाचा कोन. हमखास यशाची खात्री देणार्या जाहिराती करून विद्यार्थी आकर्षित करणारे शिकवणी वर्ग यशातील आणि पर्यायाने पैशाच्या ओघातील 'सातत्य' राखण्यासाठी कोणत्या थराला जात आहेत, हे यानिमित्ताने दिसते. म्हणूनच त्यावर भाष्य आवश्यक.

रेणुकाई करिअर सेंटर अर्थात 'आरसीसी' या नावाने किंवा मोटेगावकर सरांचा क्लास या नावाने प्रसिद्ध असलेल्या शिकवणी वर्गाचे संचालक शिवराज मोटेगावकर यांना 'सीबीआय'ने सोमवारी ताब्यात घेतले. त्यांना 'नीट'मधील प्रश्न कुठून मिळाले, ते त्यांनी पुढे कुणाकुणाला धाडले, या संपूर्ण प्रकरणात त्यांची भूमिका किती कळीची, असे प्रश्न आता तपास संस्था सोडवेल. आणखी खोलही जाईल. यानिमित्ताने ज्या प्रश्नाला सामोरे जायचे आहे, तो आहे देशभरातील वार्षिक लाखभर कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या 'शिकवणी वर्ग' नावाच्या समांतर शिक्षण व्यवस्थेला नियंत्रित करण्याचा. शिकवणी वर्ग ही संकल्पना नवीन नाही. अभ्यासात थोडा कच्चा असलेल्या विद्यार्थ्याला शाळा–महाविद्यालयाच्या तासिकांव्यतिरिक्त मार्गदर्शन करून त्याचा अभ्यास पक्का करून घेण्यासाठी शिकवण्या सुरू झाल्या. पण गेल्या चार दशकांत परिस्थिती प्रचंड पालटली. चांगले पैसे मिळवून देणारे करिअर पदरात पाडून घेण्याचा हमखास मार्ग म्हणजे अभियांत्रिकी आणि वैद्यकीय अभ्यासक्रम करणे, हा समज अधिक दृढ होण्याचा हा काळ. खासगी शिक्षणसंस्थांच्या वाढीचा मार्गही याच काळात मोकळा झाला. त्यांनी सुरू केलेल्या 'श्रीमंत' व्यावसायिक अभ्यासक्रमांना हव्या असलेल्या विद्यार्थ्यांनी दहावीनंतर विज्ञान शाखेत आणि नंतर अभियांत्रिकी वा वैद्यकीय शाखेकडे वळणे गरजेचे बनले. त्यातून आधी सुरू झाले, ते दहावीत 'चांगले' गुण मिळवून 'चांगल्या' कनिष्ठ महाविद्यालयांत विज्ञान शाखेचा प्रवेश सुकर करणारे व्यावसायिक शिकवणी वर्ग. दहावीतल्या गुणांसाठी चालवल्या जाणार्या वर्गांनी तर सामान्य, निम्नहुशार आणि हुशार अशा तुकड्यांमध्ये वर्गवारी करून त्यानुसार शुल्काचेही अनुक्रमे चढे दर ठरवले. पुढे विज्ञान शाखेला गेल्यावर विद्यार्थ्याला उत्तम शिकविणार्यांपेक्षा उत्तरपत्रिकेत चोख लिहिता येतील, अशा उत्तम नोट्स देणारे शिक्षक असलेले शिकवणी वर्ग अधिक भुलवू लागले. बारावीच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित किंवा जीवशास्त्राच्या सरासरी गुणांवर

अभियांत्रिकी–वैद्यकीय प्रवेश होईस्तोवर हे ठीक होते. पुढे नव्या शतकाच्या उंबरठ्यावर प्रवेशासाठी स्वतंत्र परीक्षा अर्थात सीईटी आवश्यक बनली. मग त्यात गुण मिळवून देण्यासाठी नवे शिकवणी कारखाने. त्यात तर देशपातळीवर, राज्य पातळीवर, संस्था पातळीवर अशा विविध प्रवेश परीक्षा असल्याने त्यानुसार शुल्क वर्गीकरण. धंदाच धंदा.–दीडेक दशकापूर्वी अनेक प्रवेश परीक्षांऐवजी विशेषत: अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि व्यवस्थापनशास्त्र प्रवेशांसाठी देशभरात प्रत्येकी एकच प्रवेश परीक्षा असावी, असा विचार पुढे आला. अभियांत्रिकीसाठी 'जेईई–मेन', वैद्यकीयसाठी 'नीट' आणि व्यवस्थापनशास्त्रासाठी 'सीमॅट' अशा परीक्षा आवश्यक झाल्या. राज्यपातळीवर सीईटी होत असताना त्याची कमी काठिण्यपातळी आणि चुकीच्या उत्तरासाठी उणे गुण नसल्याने उत्तर चुकले तरी गुण वजा न होण्याचा धोका, ही मुभा यामुळे संपली. त्यावर गदारोळ होऊन काही काळातच अभियांत्रिकी आणि व्यवस्थापनशास्त्र प्रवेशांसाठी महाराष्ट्रासह काही राज्यांत राज्य पातळीवर 'सीईटी' परतली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने 'नीट' मात्र टिकली. या 'नीट'मध्ये चांगले गुण मिळवायचे, तर फक्त योग्य उत्तरे देऊन भागत नाही; कमीत कमी उत्तरे चुकली, तर कमीत कमी गुण वजा होतील, याचेही भान ठेवावे लागते. शिकवणी वर्गात प्रामुख्याने हे तंत्र शिकवले जाते. याच्या तयारीसाठीचे साधारण सरासरी वार्षिक शुल्क दीड लाख ते अडीच लाखांच्या घरात आहे. यंदा पावणेतेवीस लाख विद्यार्थी या परीक्षेला बसले. त्यातील मोजके वगळता बहुतांश शिकवणी वर्गांवरच अवलंबून असतील, तर यातील पैशांच्या प्रचंड उलाढालीचा सहज अंदाज यावा. अभ्यासक्रम शिकवून झाल्यावर होणार्या सराव परीक्षा हा या वर्तुळातील शेवटचा, पण अत्यंत महत्त्वाचा बिंदू. अनेक शिकवणी वर्ग त्यासाठीही स्वतंत्र शुल्क आकारतात. काही विद्यार्थी तर वेगवेगळ्या शिकवणी वर्गांच्या वेगवेगळ्या सराव परीक्षा हे अतिरिक्त शुल्क भरून देतात. यंदाच्या 'नीट' मधील प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांना या अशाच सराव परीक्षा किंवा परीक्षापूर्व मार्गदर्शन सत्रांतून पाय फुटलेले दिसतात.

# शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के प्रवेश प्रक्रियेला अमळनेरात उत्स्फूर्त प्रतिसाद

## १४५ अर्जांपैकी १२३ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित; २२ अर्ज प्रलंबित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) २५ टक्के प्रवेश प्रक्रियेअंतर्गत अमळनेर तालुक्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेशासाठी पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पहिली व दुसरी फेरी मिळून एकूण १४५ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १२३ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. तर २२ अर्ज अद्याप प्रलंबित असल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, पहिल्या फेरीत तालुक्यातील १४ शाळांसाठी १४५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ९६ विद्यार्थ्यांना प्रवेश मंजूर करण्यात आला. १५ अर्ज प्रलंबित राहिले असून काही अर्जांवरील निर्णय प्रक्रिया अद्याप सुरू आहे. दरम्यान, दुसऱ्या फेरीत ४९ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी २७ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून २२ अर्जांवर अंतिम निर्णय होणे बाकी आहे. तालुक्यातील पी. बी. ए. इंग्रजी माध्यम शाळेला दोन्ही फेऱ्यांमध्ये सर्वाधिक प्रतिसाद मिळाला. या शाळेत पहिल्या फेरीत




३६ तर दुसऱ्या फेरीत ११ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी अनुक्रमे २५ व ६ विद्यार्थ्यांना प्रवेश मंजूर करण्यात आला. याशिवाय स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय शाळा, सायरदेवी बोहरा सेंट्रल शाळा, न्यू व्हिजन इंग्रजी माध्यम शाळा तसेच ॲड. ललिता पाटील आंतरराष्ट्रीय शाळेमध्येही पालकांनी मोठ्या प्रमाणावर अर्ज दाखल केले आहेत. तर श्री दत्तात्रय गुरु इंग्रजी शाळा आणि गुरुकुल इंग्रजी माध्यम शाळेमध्ये प्राप्त झालेल्या सर्व अर्जांना मंजुरी मिळाल्याची माहिती समोर आली आहे. काही शाळांमध्ये अद्याप कागदपत्र पडताळणी व अंतिम मंजुरी प्रक्रिया सुरू असून प्रलंबित अर्जांवर लवकरच निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.



## ३८२ पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या मुदत संपलेल्या , प्रशासकीय , कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक ,कौटुंबिक अडचणी पाहता विनंतीपर अशा ३८२ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी २८ मे रोजी जारी केले आहेत. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ४३ , पोलीस हेडकॉन्स्टेबल १०१ , पोलीस नाईक २५ , पोलीस कॉन्स्टेबल १२४ , महिला हेडकॉन्स्टेबल ४९ अशा एकूण ३४२ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. तर कायदा आणि सुव्यस्थेची निकड , मचाऱ्यांच्या अडचणी ,विनंती आणि प्रशासकीय कामकाज आदी बाबींचा विचार करून २० सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक , २२ हेडकॉन्स्टेबल , ११ नाईक , ३५ कॉन्स्टेबल , ९ महिला कॉन्स्टेबल याना एक वर्षासाठी आहे त्याच जागेवर एक वर्षासाठी स्थगिती देण्यात आली आहे. तर ४० कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्या करण्यात आल्या असून त्यातील १२ कर्मचाऱ्यांनी स्वत:हून पोलीस मुख्यालय मागून घेतले आहे.

## पैलाड भागात मोकाट जनावरांचा सुळसुळाट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरः शहरातील पैलाड भागात गेल्या काही दिवसांपासून मोकाट जनावरांचा वावर प्रचंड प्रमाणात वाढला असून, यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनधारक कमालीचे हैराण झाले आहेत. रस्त्यांच्या मध्यभागी ठाण मांडून बसणाऱ्या या जनावरांमुळे वाहतुकीचा बऱ्याचदा खोळंबा होत आहे.

## अंगणात पाणी शिंपडण्याच्या कारणातून मारहाण; साने नगर मधील चौघांविरुद्ध गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अंगणात पाणी मारण्याच्या किरकोळ कारणातून चौघांनी एकाच कुटुंबातील तिघांना काठीने जोरदार मारहाण करून जखमी केले. ही घटना शहरातील साने नगर परिसरात शनिवार, दि. २३ मे रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास घडली. या प्रकरणी अमळनेर पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिराबाई रमेश खैरनार (रा. वणी, ता. धुळे, हल्ली मुक्काम नवागाम–दिंडोली, सुरत) यांनी फिर्यादीत म्हटले आहे, की माझी बहीण अन्नपूर्णा रघुनाथ खैरनार व सासूबाई दगूबाई पूनमचंद सोनवणे (दोन्ही रा. सानेनगर) यांना शुक्रवार, दि. २२ मे रोजी अंगणात पाणी मारण्याच्या कारणातून त्यांच्या घरासमोर राहणाऱ्या पुष्पाबाई जवाहरलाल सोनवणे व भारती समाधान मैराळे यांनी मारहाण केली होती. या घटनेनंतर शनिवार, दि. २३ मे रोजी हिराबाई खैरनार, त्यांचे पती रमेश खैरनार व मुलगी पूनम विनोद मोरे (रा. गांधलीपुरा) हे साने नगरात अन्नपूर्णा खैरनार यांच्या अंगणात दुपारी दोन वाजता उभे होते. त्यावेळी पुष्पाबाई सोनवणे, भारती मैराळे, किशोर भिकन बिऱ्हाडे व दीपक चौधरी (रा. धुळे रोड) हे तेथे आले. त्यांनी त्यांना शिवीगाळ करत



वाद घालणे सुरू केले. वाद विकोपास गेल्यानंतर किशोर बिऱ्हाडे याने हातातील काठीने हिराबाई, रमेश खैरनार व पूनम मोरे यांच्या हातावर जोरदार मारहाण करून त्यांना जखमी केले. तसेच इतर तिघांनी चापटा–बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच भांडण सोडविण्यासाठी आलेले रघुनाथ खैरनार यांनाही मारहाण करण्यात आली.

जखमींना प्रथम ग्रामीण रुग्णालयात उपचारार्थ नेण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना डॉ. दिनेश पाटील यांच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर फिर्यादींनी या घटनेबाबत अमळनेर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या घटनेचा पोलीस शिपाई कैलास शिंदे व अशोक साळुंखे तपास करीत आहेत.

## लग्नसमारंभासाठी अमळनेरला आलेले वृद्ध बेपत्ता

**पान १ वरून**

अंबिका मंगल कार्यालय येथे आयोजित लग्नसमारंभासाठी आले होते. दिवसभर ते लग्नकार्याच्या ठिकाणी उपस्थित होते. मात्र सायंकाळी गावातील लोक परत गावी गेले असता काळू बोरसे त्यांच्यासोबत परतले नाहीत. गावकऱ्यांकडे चौकशी केली असता, "ते दुपारपर्यंत लग्नसमारंभात होते, त्यानंतर कुठे गेले याची माहिती नाही," असे सांगण्यात आले. दरम्यान, अमळनेर येथील एका नातेवाईकांच्या घरी त्यांनी भेट दिली होती. मात्र "लग्नाला जायचे आहे," असे सांगून ते तेथून निघून गेले होते. त्यानंतर अमळनेर शहरासह परिसरातील विविध नातेवाईकांकडे आणि ओळखीच्या ठिकाणी शोध घेण्यात आला. मात्र त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही. अखेर त्यांचे पुत्र उमेश काळू बोरसे यांनी अमळनेर पोलीस ठाण्यात धाव घेत हरवल्याची तक्रार दाखल केली आहे. पोलीसांकडून पुढील तपास सुरू असून नागरिकांना संबंधित व्यक्तीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास अमळनेर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शायर डॉ. बशीर बद्र यांचे निधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : प्रसिद्ध उर्दू शायर आणि गझलकार डॉ. बशीर बद्र (वय ९१) यांचे २८ मे २०२६ रोजी भोपाळ (मध्य प्रदेश) येथील राहत्या घरी निधन झाले ते गेल्या काही वर्षांपासून 'डिमेंशिया' (स्मृतीभ्रंश) आजाराशी झुंजत होते त्यांच्या निधनाने उर्दू साहित्य विश्वात मोठी शोककळा पसरली आहे. "कुछ तो मजबूरियाँ रही होंगी, यूँ ही कोई बेवफा नहीं होता" आणि "न जाने किस गली में ज़िंदगी की शाम हो जाए" यांसारख्या त्यांच्या अजरामर गझला आजही रसिकांच्या ओठांवर आहेत

## सुरत महानगरपालिकेच्या उप महापौरपदी कळमसरेचे सुधाकर चौधरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

### सुधाकर चौधरी यांच्या निवडीने केला ग्रामस्थांनी जल्लोष



येथील रहिवासी तथा सुरत येथे व्यवसायानिमित्त स्थायीक झालेले सुधाकर लोटन चौधरी यांची सुरत महानगर पालिकेच्या उपमहापौर निवड झाली आहे.

गेल्या तीन पंचवार्षिक निवडणूकीपासून ते सुरत महानगर पालिकेत बहुमताने निवडून येत आहेत. सर्वसामान्य मतदारांच्या आरोग्य, सामाजिक समस्याना न्याय देत सलग तीन पंच वार्षिक निवडून येण्याचा बहुमान त्यांना मिळाला आहे. सुधाकर चौधरी हे कळमसरे येथून कामानिमित्त सुरत येथे स्थायिक झाले आहेत. त्याठिकाणीही त्यांनी सामाजिक सलोखा जोपासला आहे. सुरत शहरात ते माळी समाजाचे गेल्या वीस वर्षापासून अध्यक्ष असून आपल्या सामाजिक कामातून गेल्या पंधरा वर्षापासून ते सर्व समाजाचा स्वखर्चाने सर्व जातीय सामूहिक विवाह सोहळा आयोजित करीत असतात.सर्व सामान्यांच्या समस्यांना न्याय देण्यासाठी तत्पर असल्याने ते तिसऱ्यांदा निवडून आल्याने भाजपा पक्षाने त्यांना उप महापौरपदाची संधी मिळाली आहे. त्यांच्या या निवडीने कळमसरेतील सर्व माळी समाज बांधव व ग्रामस्थांनी त्यांच्या या विजयाचा गावात सर्वत्र जल्लोष साजरा केला. खान्देशातील कळमसरे गावाचे नाव सुरत येथे लौकिक केल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या या निवडीबद्दल माळी समाज पंच मंडळ, ग्रामपंचायत पदाधिकारी, विकास सोसायटीचे पदाधिकारी सर्व समाज बांधवानी अभिनंदन व कौतुक केले.







हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# पहली ट्रेन लेट होने से छूट गई दूसरी ट्रेन?

## जानिए कैसे मिलेगा टिकट का पूरा रिफंड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अगर पहली ट्रेन लेट होने की वजह से आपकी दूसरी यानी कनेक्टिंग ट्रेन छूट जाती है, तो रेलवे कुछ शर्तों के साथ टिकट का पूरा पैसा वापस देता है। इसके लिए टिकट बुक करते समय कनेक्टिंग जर्नी ऑप्शन चुनना जरूरी होता है। यात्रियों को पहली ट्रेन पहुंचने के ३ घंटे के अंदर टीडीआर फाइल करना होता है।

हर दिन भारत में लाखों लोग ट्रेन से सफर करते हैं। लंबी दूरी की यात्रा करने वाले कई यात्री एक शहर से दूसरे शहर पहुंचने के लिए कनेक्टिंग ट्रेन का सहारा लेते हैं। यानी पहले एक ट्रेन से सफर किया जाता है और फिर दूसरी ट्रेन पकड़कर आगे की यात्रा पूरी की जाती है। लेकिन कई बार ऐसा होता है कि पहली ट्रेन देर से पहुंचती है और उसकी वजह से दूसरी ट्रेन छूट जाती है। ऐसे में यात्रियों को काफी परेशानी का सामना करना पड़ता है। लोगों के मन में सबसे बड़ा सवाल यही होता है कि अगर कनेक्टिंग ट्रेन छूट जाए तो क्या टिकट का पैसा वापस मिलेगा?

अब रेलवे और आयआरसीटीसीने यात्रियों की सुविधा के लिए ऐसे मामलों में रिफंड का नियम बनाया है। अगर आपकी पहली ट्रेन लेट होने की वजह से दूसरी ट्रेन छूट जाती है, तो कुछ शर्तों के साथ आपको टिकट का पूरा पैसा वापस मिल सकता है। हालांकि इसके लिए सही तरीके से टिकट बुक करना और समय पर रिफंड के लिए आवेदन करना जरूरी होता है। सबसे पहले यह जान लें कि यह सुविधा तत्काल टिकट पर लागू नहीं होती। यानी अगर आपने तत्काल टिकट बुक किया है, तो इस नियम के तहत रिफंड नहीं मिलेगा। यह नियम सामान्य रिजर्वेशन टिकट पर लागू होता है। अगर आप चाहते हैं कि कनेक्टिंग ट्रेन छूटने पर आपको रिफंड मिल सके, तो टिकट बुक करते समय कुछ खास बातों का ध्यान रखना होगा।



### कैसे मिलेगा रिफंड?

जब आप आयआरसीटीसी ॲप या वेबसाइट से टिकट बुक करते हैं, तब आपको कनेक्टिंग जर्नी बुकिंग का ऑप्शन दिखाई देता है। अगर आपकी यात्रा में दो ट्रेनें शामिल हैं, तो आपको इस ऑप्शन को जरूर चुनना चाहिए। इसके बाद आपको पहली ट्रेन के टिकट का पीएनआर नंबर दर्ज करना होता है। इससे रेलवे को पता चल जाता है कि आपकी दूसरी ट्रेन पहली ट्रेन से जुड़ी हुई यात्रा का हिस्सा है। अगर बाद में पहली ट्रेन देर से पहुंचती है और आप दूसरी ट्रेन नहीं पकड़ पाते, तो ऐसी स्थिति में रेलवे आपको दूसरी ट्रेन के टिकट का पूरा पैसा वापस कर सकता है।

### रिफंड के लिए क्या करना होगा?

अगर आपकी कनेक्टिंग ट्रेन छूट जाती है, तो आपको तुरंत रिफंड के लिए आवेदन करना होगा। रेलवे के नियम के अनुसार, पहली ट्रेन के पहुंचने के ३ घंटे के अंदर आपको रिफंड के लिए अप्लाई करना जरूरी है। आईआरसीटीसी की भाषा में इसे टीडीआर यानी टिकट डिपॉजिट रिसीट भरना कहा जाता है। इसके बाद आपको टिकट का पैसा वापस कर दिया जाएगा।

सबसे पहले यह जान लेना जरूरी है कि यह नियम तत्काल टिकट पर लागू नहीं होता। अगर आप इस सुविधा का फायदा उठाना चाहते हैं, तो टिकट बुक करते समय आयआरसीटीसी ॲप या वेबसाइट पर कनेक्टिंग जर्नी बुकिंग वाला ऑप्शन चुनना होगा। इसके बाद आपको अपनी पहली ट्रेन का पीएनआर नंबर दर्ज करना होता है, ताकि रेलवे को पता चल सके कि आपकी दूसरी ट्रेन उसी यात्रा का हिस्सा है।

अगर पहली ट्रेन देर से पहुंचती है और उसकी वजह से आपकी कनेक्टिंग ट्रेन छूट जाती है, तो ऐसी स्थिति में आप दूसरी ट्रेन के टिकट का पूरा रिफंड पाने के हकदार हो सकते हैं। इसके लिए जरूरी है कि पहली ट्रेन के पहुंचने के ३ घंटे के अंदर आयआरसीटीसी पर रिफंड के लिए आवेदन किया जाए। रेलवे की भाषा में इस प्रक्रिया को टीडीआर भरना कहा जाता है। सही समय पर टीडीआर फाइल करने के बाद रेलवे मामले की जांच करता है और नियम सही पाए जाने पर टिकट का पैसा वापस कर दिया जाता है।

### किन बातों का ध्यान रखना जरूरी है?

रिफंड पाने के लिए सिर्फ ट्रेन छूटना ही काफी नहीं है, बल्कि कुछ शर्तें भी पूरी करनी होती हैं। जैसे दोनों ट्रेनों के बीच उचित समय का अंतर होना चाहिए. पहली और दूसरी ट्रेन के बीच का गैप बहुत ज्यादा नहीं होना चाहिए। रेलवे के अनुसार, दोनों ट्रेनों के बीच अधिकतम ५ दिन का अंतर ही मान्य होता है। अगर इससे ज्यादा अंतर हुआ, तो यह सुविधा लागू नहीं होगी. टिकट सही तरीके से कनेक्टिंग जर्नी के रूप में बुक होना चाहिए।

### यात्रियों के लिए क्यों जरूरी है यह नियम?

पहले कई बार ऐसा होता था कि पहली ट्रेन लेट होने के कारण यात्रियों की दूसरी ट्रेन छूट जाती थी और उनका पूरा पैसा खराब हो जाता था। नई व्यवस्था से यात्रियों को बड़ी राहत मिली है। अब अगर यात्रा सही तरीके से बुक की गई हो, तो ट्रेन लेट होने की स्थिति में यात्रियों को आर्थिक नुकसान कम उठाना पड़ेगा। इसलिए अगली बार अगर आप दो ट्रेनों से यात्रा करने की योजना बना रहे हैं, तो टिकट बुक करते समय कनेक्टिंग जर्नी वाला विकल्प जरूर चुनें। इससे जरूरत पड़ने पर आपको रिफंड पाने में आसानी होगी।

# तेंदू पत्ता बीनने वाला लड़का अब बनेगा ‘साहब’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

छत्तीसगढ़ के जंगलों से निकली एक कहानी आज लोगों के दिल छू रही है। यह कहानी है रायगढ़ जिले के एक छोटे से गांव ‘संबलपुरी’ के रहने वाले अजय गुप्ता की। आज अजय ने वो मुकाम हासिल किया है जिसका सपना हर कोई देखता है, लेकिन वहां तक पहुंचने का रास्ता उनके लिए कांटों भरा था।

अजय का बचपन बाकी बच्चों जैसा नहीं था। जब दूसरे बच्चे खिलौनों से खेलते थे, तब अजय तपती धूप में अपने माता-पिता के साथ जंगलों में तेंदू पत्ता और महुआ चुनते थे। उनका पूरा परिवार इसी ‘वनोपज’ (Forest Produce) पर निर्भर था। तंगहाली ऐसी थी कि एक-एक रुपया जोड़ना पड़ता था, लेकिन अजय की आंखों में एक अलग ही चमक थी।

### पढ़ाई में शुरू से थे ‘टॉपर’

गरीबी कभी अजय के सपनों के आड़े नहीं आई। उन्होंने अपनी मेहनत से सबको हैरान कर दिया। अजय ने १०वीं क्लास में ९२.६६% और १२वीं में ९१.४०% मार्क्स लाकर अपनी काबिलियत साबित कर दी। उनकी इसी मेहनत की वजह से उन्हें NIT रायपुर में एडमिशन मिला, जहां स्कॉलरशिप की मदद से उन्होंने अपनी इंजीनियरिंग पूरी की।



### एक नहीं, दो-दो बड़ी सफलताएं

२९ साल के अजय ने इस साल इतिहास रच दिया है। उन्होंने इंडियन फॉरेस्ट सर्विस (IFoS) की परीक्षा में पूरे देश में ९१वीं रैंक हासिल की है। इतना ही नहीं, उन्होंने UPSC सिविल सेवा परीक्षा में भी ४५२वीं रैंक पाकर अपनी जीत का परचम लहराया है।

### फॉरेस्ट सर्विस में जाएंगे अजय

अजय बताते हैं कि जब वो गांव में थे, तो उन्हें लगता था कि दुनिया बस वहीं तक है। लेकिन जब वो NIT पहुंचे, तब उन्हें एहसास हुआ कि वो भी बड़े सपने देख सकते हैं। बस्तर में रूरल डेवलपमेंट (ग्रामीण विकास) के काम के दौरान उनका इरादा और पक्का हो गया कि उन्हें फॉरेस्ट सर्विस में ही जाना है।

### मुख्यमंत्री ने दी बधाई

अजय की इस जादुई सफलता पर छत्तीसगढ़ के मुख्यमंत्री विष्णु देव साय ने भी उन्हें बधाई दी। सीएम ने बड़े ही भावुक अंदाज में कहा कि यह हमारे वनवासी परिवारों के अटूट भरोसे की जीत है। यह गर्व की बात है कि जो युवा कभी जंगलों में तेंदू पत्ता चुनता था, आज वही इन जंगलों की सुरक्षा की जिम्मेदारी संभालेगा।

# वडिलांच्या आधी आईला मान!

## नावापुढे मातेचे नाव जोडणारी पहिली व्यक्ती मराठी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या इतिहासात सातवाहन साम्राज्याला अत्यंत मानाचे स्थान आहे.

### दोन अधिनायक

मराठी इतिहासात छत्रपती शिवाजी महाराज आणि गौतमीपुत्र सातकर्णी हे दोन महान अधिनायक विशेषत्वाने ओळखले जातात.



### आईच्या नावाचा गौरव

गौतमीपुत्र सातकर्णी यांनी आपल्या नावापूर्वी ‘गौतमी’ हे आईचे नाव लावून मातृसन्मानाचा अद्वितीय आदर्श निर्माण केला.

### साम्राज्याचा विस्तार

इसवी सन पूर्व २०० ते इ.स. २१८ पर्यंत सातवाहनांचे साम्राज्य बंगालच्या उपसागरापासून अरबी समुद्रापर्यंत विस्तारले होते.

### ऐतिहासिक लढाई

गौतमीपुत्र सातकर्णी यांनी शक क्षत्रप राजा नहपानाचा पराभव करून परकीय प्रभाव मोडून काढला. हा विजय महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

### गुढीपाडव्याशी जोडली जाते परंपरा

‘शालिवाहन शक’ या कालगणनेशी सातवाहनांचे नाव जोडले गेले. काही परंपरांनुसार गुढीपाडवा हा विजय आणि वैभवाचे प्रतीक म्हणून साजरा केला जातो.

### सुवर्णकाळ


सातवाहनांच्या काळात भारतातील व्यापारी मार्ग अधिक मजबूत झाले. कला, संस्कृती, नाणेव्यवस्था यामध्येही मोठी प्रगती झाली.

### महत्त्वाचा अध्याय

सातवाहन साम्राज्य हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि राजकीय इतिहासाचा अभिमानास्पद अध्याय मानला जातो.













# महाभारत काळात हनुमानजींनी केलेले पराक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

### १ पौंड्रकच्या नगराला उद्ध्वस्त करणे

पौंड्र नगरीचा राजा स्वतःला भगवान वासुदेव समजत होता. तो भगवान श्रीकृष्णाला आपला शत्रू मानत होता. एकदा भगवान श्रीकृष्णाने माया रचून त्याच्या महालात कमळाचे फूल पाडले त्यांनी ते कमळाचे फूल बघून आपले मित्र काशीराज आणि वानर द्वितला विचारले की हे फूल कुठे सापडेल,
काशीराज ने उत्तर दिले की गंधमादन पर्वतावर हे फूल सापडेल. वानर द्वित म्हणे की मी घेऊन येतो आपल्यासाठी. भगवान हनुमान त्याच दिव्य कमळाच्या तलावाजवळ राहायचे.भगवान श्रीकृष्णाच्या आदेशावरून ते स्वतः वानर द्वितसह कैदी होऊन पौंड्र नगरीत जाऊन पोहोचतात आणि पौंड्रकला चेतावणी देतात की जर तुम्ही स्वतःला देव मानायचे थांबवले नाही आणि अधर्माचे मार्ग सोडले नाही तर प्रभू तुला ठार मारतील. नंतर भगवान हनुमान त्याच्या नगरीला उद्ध्वस्त करून पुन्हा गंधमादन पर्वतावर निघून जातात. नंतर बलराम वानर द्वितचे आणि भगवान श्रीकृष्ण पौंड्रकचे वध करतात.

### २ भीमाचे गर्वहरण केले

एकदा भीम द्रौपदीच्या सांगण्या वरून गंधमादन पर्वताच्या त्या कमळाच्या तलावाजवळ पोहोचतात जिथे भगवान हनुमानजी राहत होते.भगवान हनुमानजी वाटेत निजलेले होते तर भीमाने त्यांना वाटेतून बाजूस होण्याचे सांगितले. भगवान हनुमानजी म्हणाले की आपण तर सामर्थ्यवान आहात आपण स्वतः माझ्या शेपटीला बाजूला करून वाट काढून घ्या. पण भीम त्यांच्या शेपटीला हालवू देखील शकले नाही.



नंतर भीमाला हे कळतातच की हेच पवनपुत्र हनुमान आहे तर त्यांनी त्यांच्या कडे माफी मागितली.

### ३ अर्जुनाचे गर्वहरण केले

त्याच प्रमाणे एकदा अर्जुनाला नदी पार करायची होती तर त्यांनी आपल्या धनुर्विद्येने बाणाचा एक पूल बनविला आणि रथासह ती नदी पार केली. नदी पार केल्यावर त्यांची भेट भगवान हनुमानाशी झाली. अर्जुनाने त्यांना म्हटले की भगवान राम तर माझ्या प्रमाणेच धनुर्धारी होते तर ते मी बनविल्या प्रमाणे बाणांचा पूल बनवू शकत होते. तेव्हा भगवान हनुमानजी म्हणाले की त्या काळात माझ्यापेक्षा अधिक सामर्थ्यवान वानर होते. हा असा बाणांचा सेतू त्यांच्या वजनानेच कोसळला असता आणि तुम्ही हा बांधलेला पूल तर माझेच वजन सहन करू शकणार नाही. अर्जुन गर्विष्ठ होऊन म्हणे की कोण म्हणत की मी बांधलेले हे पूल आपले वजन घेऊ शकणार नाही. जर आपल्या चालण्याने हे पूल कोसळले तर मी स्वतःला सर्वश्रेष्ठ धनुर्धर समजणे सोडून देईन. तेव्हा भगवान हनुमानजी त्या पुलावर फक्त आपले एकच पाय ठेवतात आणि तो पूल कोसळतो.

### ४ बलरामचे गर्वहरण केले

बलराम आपल्या एकाच हाताच्या प्रहाराने वानर द्वितला ठार मारले. असे केल्यावर त्यांना गर्व झाले. तेव्हा भगवान श्रीकृष्णाच्या आदेशावरून भगवान हनुमान द्वारिकेच्या बागेत शिरले आणि फळे खाऊन त्यांनी नासधूस करण्यास सुरुवात केली. बलरामांना हे कळल्यावर त्यांनी स्वतः आपली गदा घेतली आणि त्यांना धडा शिकवायचे ठरविले. दोघांमध्ये गदायुद्ध होतो बलराम त्या युद्धात दमून जातात तेव्हा ते हनुमानाला विचारतात की आपण कोण आहात मला सांगा नाही तर मी नांगर काढेन. तेव्हा भगवान श्रीकृष्ण आणि रुक्मिणी तेथे प्रगट होऊन त्यांना सांगतात की हे स्वतः पवनपुत्र हनुमान आहेत. त्याच प्रमाणे भगवान हनुमानाने गरुडदेव आणि सुदर्शन चक्राचे देखील गर्व हरण केले.

### ५ महाभारताचे युद्ध आणि भगवान हनुमान

भगवान श्रीकृष्णाच्या आदेशावरूनच भगवान हनुमान कुरुक्षेत्राच्या युद्धात सूक्ष्म रूपात त्यांच्या रथावर बसले होते. हेच कारण होते की प्रथम भीष्म आणि नंतर कर्णाच्या प्रहारा नंतर देखील त्यांचे रथ संरक्षित होते, अन्यथा कर्ण इतके सामर्थ्यवान होते की त्यांनी त्यांच्या रथाला कधीच उद्ध्वस्त केले असते.

# व्रताचरणाचे महत्त्व अनन्यच!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येकाला प्रत्येक व्रत करणे शक्य नसते. त्यामुळे त्याचा जन्म वाया जाईल, असे अजिबात नाही. 'पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भया समर्पयेत' असे भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगून ठेवलेच आहे. अनन्य भावनेने पान, फूल, फळ इतकेच काय पण नुसते पाणीही अर्पण केले तरी त्याच्या उद्धाराची हमी भगवंतानी घेतली आहे. मात्र, आपल्या पात्रतेपेक्षा कमी दान, चिक्कूपणा फलद्रुप होत नाही. 'ये यथा मां प्रपद्यते तांस्तथैव भजम्यहम' असेही भगवंत म्हणतात.

जो जशी भक्ती करेल तसे आणि तेवढेच फळ त्याला मिळेल. मग जेथे आपण मोठी व्रते, यज्ञयाग करू शकत नाही, अन्नदान करू शकत नाही तेथे यथाशक्ती यथामती मदत करावी, सहकार्य करावे. निदान विघ्ने आणू नयेत.

वसिष्ठांच्या यज्ञात प्रभू श्रीरामचंद्रांनी रक्षणाचे कार्य केले आहे. धर्मराजाच्या राजसूय यज्ञात श्रीकृष्णांनी उष्ट्या पत्रावळी उचलल्या आहेत. यावरून आपल्या दर्जाची कामाच्या सेवेच्या पातळीशी तुलना करू नये. याउलट अनसुयेच्या तापचरणाचा भंग करण्याच्या प्रयत्नामुळे ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तिघांनाही बालके बनून राहावे लागले.

व्रतभंग यामुळेच पातक आहे. सुशीला आणि विमला या दोघी सवती आपले पती शकलीसह मधुबनात राहत होत्या. सुशीलेला अधिक मासात नंदादीप-दीपदानाचे व्रत कळले. तिने ते विधिवत सुरु केले. तिच्या सवतीला ते पाहवले नाही. तिने अनेकदा दीप विझवून त्यातील तूप सांडून सुशीलेच्या व्रताचा भंग करण्याचा प्रयत्न केला, पण शुद्ध मनाच्या सुशीलेने भगवंताची क्षमायाचना करून सवतीलाही शासन न करण्याची विनंती केली. अधिकमास संपताना विधिवत पूजा करून समाप्ती केली. त्यामुळे तिला नवीन तेज प्राप्त झाले. सवत मात्र दृष्टीने अधू झाली. खूप यातना भोगून निवर्तली. मृत्यूनंतरही तिला यमयातना भोगाव्या लागल्या. अनेक नीच योनीत जन्म घ्यावा लागला आणि दुःख भोगावे लागले. म्हणून हे लक्ष्मी मानवाने अधिक मासात अशा प्रकारचे अखंड दीपाचे व सत्पात्र ब्राम्हणाला दीपदानाचे व्रत करून आपल्या जन्माचे सार्थक साधावे. देवाजवळ कलश स्थापना करावी. आणि त्यावर शुद्ध तुपाचा दिवा अखंड तेवत राहील, याची काळजी घ्यावी. तुपाच्या ज्वलाने आरोग्याला हितकर वातावरणाचे पोषण होते. डोळ्यांची जळजळ कमी होते. आता तर हृदयाच्या रुग्णाला सुद्धा चांगले तूप खाल्याने दुष्परिणाम होत नाहीत. रक्तातील मेद घटक वाढत नाहीत. उलट संधिवात वातावर उत्तम उपयोग होतो. असे प्रतिपादन आयुर्वेद तज्ञाने केल्याचे वाचनात आहे. या दृष्टीने परमार्थाबरोबर ऐहिक लाभही या व्रताचरणाने होतात.

# हनुमानजींकडून या गोष्टी शिका, ज्या तुमचे संपूर्ण आयुष्य बदलून टाकतील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सनातन धर्मात, हनुमानजींना शक्ती, ज्ञान आणि भक्तीचे सर्वोच्च प्रतीक मानले जाते. हनुमानजी हे जीवन व्यवस्थापनाचे महान गुरू आहे. तसेच आयुष्यात अनेक अडचणी येतात, पण वाईट काळात कधीही धैर्य गमावू नये. हनुमानजी हेच शिकवतात. आज आपण हनुमानजींबद्दलच्या अशा पाच गोष्टी पाहणार आहोत, ज्या प्रत्येकाने शिकल्या पाहिजेत. हनुमानजींचे संपूर्ण आयुष्य भगवान श्रीरामांना समर्पित होते. आजच्या काळात, आपल्यामध्ये या 'समर्पणाची' तीव्र कमतरता आहे. तुमचे करिअर असो, शिक्षण असो किंवा कोणतेही नातेसंबंध असो, जोपर्यंत तुम्ही त्यात 100टक्के समर्पण दाखवत नाही, तोपर्यंत तुम्हाला सर्वोत्तम परिणाम मिळणार नाहीत. हनुमान आपल्याला आपल्या ध्येयांप्रति पूर्णपणे समर्पित राहायला शिकवतात. हे यशाचे पहिले पाऊल आहे.

जेव्हा हनुमान लंकेत माता सीतेला पहिल्यांदा भेटले, तेव्हा ते थेट त्यांच्याशी बोलले नाहीत. त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी प्रथम प्रभू रामाची कथा सांगितली. रावणाच्या दरबारात, त्यांनी अत्यंत धैर्याने आणि स्पष्टपणे आपले



विचार मांडले. यावरून आपल्याला कळते की, कोणाशी, केव्हा, कुठे आणि कसे बोलावे. उत्कृष्ट संवाद कौशल्य तुम्हाला गर्दीतून वेगळे ठरवते.

समुद्र पार करताना, त्यांना सुरसा, सिंहिका आणि मैनाक पर्वतांसारख्या अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागला. हनुमान घाबरले नाहीत किंवा थांबले नाहीत. जिथे शक्तीची गरज होती तिथे त्यांनी शक्ती दाखवली आणि नम्रता दाखवली. जेव्हा कधी जीवनात मोठी आव्हाने येतात, तेव्हा घाबरण्याऐवजी संयम वापरा.

अफाट शक्ती असूनही, हनुमानामध्ये अहंकाराचा लवलेशही नव्हता. श्रीरामांनी त्यांची प्रशंसा केली, तेव्हा त्याने सर्व श्रेय प्रभूंच्या कृपेला दिले. आजकाल लोक छोट्या कामांसाठी मोठे श्रेय शोधतात. हनुमान आपल्याला शिकवतात की मोठेपणा कामात आहे, स्वतःची स्तुती करण्यात नाही. हनुमान आपली शक्ती विसरले होते, पण जेव्हा जांबवानाने त्याला आठवण करून दिली, तेव्हा त्यांनी समुद्र पार केला. आपल्यामध्येही अमर्याद क्षमता दडलेली आहे; आपल्याला फक्त स्वतःवर विश्वास ठेवण्याची आणि आपल्या ऊर्जेला जागृत करण्याची गरज आहे.

# शनैश्चर देवाचे माहात्म्य, त्याची वैशिष्ट्ये !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**१. शनिदेवता या ग्रहाचे ज्योतिषशास्त्रदृष्ट्या महत्त्व**

हिंदु धर्मात ग्रहांना देवता मानले जाते. शनिदेव हा पापग्रह असून सर्व ग्रहांमध्ये या ग्रहाला लौकिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व आहे. मकर आणि कुंभ या शनिदेवता ग्रहाच्या राशी आहेत. शनिदेवता तुळ राशीत उच्चीचा होतो. ज्योतिषशास्त्रात ग्रहांच्या उच्च आणि नीच राशी ठरवून दिलेल्या आहेत. 'ग्रह जेव्हा उच्च राशीत असतो, तेव्हा तो ज्या गोष्टींचा कारक आहे आणि कुंडलीतील ज्या स्थानांचा स्वामी आहे, त्यांसंबंधी शुभ फलदायी ठरतो', असा नियम आहे. शनिदेव हा ग्रह वायुतत्त्वाचा असून मनुष्याला आसक्तीकडून विरक्तीकडे नेतो. तो मानवाला जीवनातील मान, अपमान आणि अवहेलना यांतून परमार्थाकडे वळवतो. हा पूर्वसुकृत दर्शवणारा आणि मोक्षाची वाट दाखवणारा ग्रह आहे.एका नक्षत्रातून शनीचे भ्रमण सरासरी १ वर्ष दहा मास असते. शनि ग्रहाला 'मंद ग्रह' म्हणतात; कारण शनि एका राशीत अडीच वर्षे असतो. यामुळे शनि ग्रह पालटानंतर लगेचच त्याची चांगली अथवा वाईट फळे मिळत नाहीत, तर शेवटच्या सहा मासांत त्याचे अनुभव प्रकर्षाने जाणवतात.

**२. मानवाच्या गुण-दोषांसंदर्भात शनिदेवतेचे महत्त्व**

ज्योतिषशास्त्रानुसार प्रत्येक ग्रहाच्या शुभ (गुण) आणि अशुभ (दोष) अशा दोन बाजू असतात. कोणताही ग्रह केवळ अशुभच अथवा केवळ शुभच असतो असे नसते. या नियमाप्रमाणे शनि ग्रहाच्याही दोन बाजू आहेत; पण शनिदेवतेची फक्त 'अशुभ' ही एकच बाजू विचारात घेतली जाते; म्हणूनच लोकांच्या मनात शनिदेवतेविषयी भीती निर्माण होते. शनि हा ग्रह गर्व, अहंकार आणि पूर्वग्रह यांना दूर करून माणसाला माणुसकी शिकवतो. तो मानवाच्या अंतरंगातील उच्च गुणांची ओळख करून देतो. शनिदेव हा अनुभवातून शिक्षण देणारा शिक्षक आहे. जे शिस्तबद्ध, विनयशील आणि नम्र आहेत, त्यांना तो उच्च पदाला घेऊन जातो, तर जे अहंकारी, गर्विष्ठ आणि स्वार्थी आहेत त्यांना त्रास देतो. अशा वाईट काळातच माणसाची योग्य पारख होते. या काळात व्यक्तीला आपल्या-परक्याची जाणीव होते, स्वतःचे गुण-दोष लक्षात येतात, गर्वाचे हरण होते आणि अहंकार गळून पडतो, माणुसकीची जाणीव होते, तसेच 'एक माणूस म्हणून कसे जगावे', याचे ज्ञान होते. अविचारांनी केलेल्या कामांची फळे साडेसातीत मिळतांना दिसतात.शनि हा ग्रह कर्माचा अधिपती असून तो अहंकार नाहीसा करतो. शनि हा संवेदनेचा कारक ग्रह आहे. शनि हा चिंतनशील ग्रह असल्याने स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनासाठी प्रयत्नरत असणाऱ्या साधकांना साधनेच्या प्रयत्नांत यश देतो. शनि ग्रहामुळे चिंतन योग्य प्रकारे होण्यास साहाय्य होते.



# शनिदेवाच्या पूजेत तांब्याची भांडी का वापरू नयेत?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**सूर्यदेव आणि शनी देव यांच्यातील वैर (पौराणिक कथा)**

पौराणिक कथेनुसार, शनी देव हे सूर्यदेव आणि त्यांची पत्नी छाया यांचे पुत्र आहेत. तांब्याला ऊर्जेचे, प्रकाशाचे आणि सूर्यदेवाचे प्रतीक मानले जाते. सूर्यदेव आणि शनी देव यांच्यात अत्यंत टोकाचे वैर आहे. असे मानले जाते की, शनी देवाचा जन्म झाला तेव्हा त्यांचा काळा रंग पाहून सूर्यदेवांनी त्यांचा आणि त्यांच्या मातेचा (छाया) अपमान केला होता. तेव्हापासून शनी देव आपल्या पित्याला शत्रू मानतात. शनी देवाला आपल्या पित्याचा (सूर्यदेवाचा) धातू म्हणजेच तांबा अजिबात प्रिय नाही. जर शनी पूजेत तांब्याचा वापर केला, तर शनी देव नाराज होतात आणि पूजेचे फळ मिळत नाही, अशी धार्मिक मान्यता आहे.



**शनी देवाला 'लोखंड' का प्रिय आहे?**

ज्योतिषशास्त्रात प्रत्येक ग्रहाचा एक ठराविक धातू आणि रंग निश्चित केला आहे.

**शनीचा धातू लोखंड :** शनी देव हे कष्टकरी, कामगार, न्याय आणि कडक शिस्तीचे कारक आहेत. लोखंड हा धातू कडक, मजबूत आणि दीर्घकाळ टिकणारा आहे, जो शनीच्या प्रभावाशी मिळताजुळता आहे.

**नीलम आणि लोखंडाचा संबंध :** शनीचा मुख्य धातू लोखंड आणि रत्न 'नीलम' आहे. असे मानले जाते की लोखंडाच्या वस्तू अर्पण केल्याने किंवा लोखंडी अंगठी मधल्या बोटात धारण केल्याने शनीचा अशुभ प्रभाव कमी होतो.

**शनी पूजेत काय काळजी घ्यावी?**

जर तुम्ही शनिवारी किंवा शनी साडेसातीसाठी पूजा करत असाल, तर खालील गोष्टी लक्षात ठेवा,

तांब्याची भांडी वापरू नका : शनी देवाला अभिषेक करताना किंवा अर्घ्य देताना तांब्याचा कलश किंवा तांब्याची थाळी वापरू नका.

**या धातूंचा वापर करा :** शनी पूजेसाठी लोखंड किंवा स्टीलची भांडी वापरणे सर्वात उत्तम मानले जाते.

**लोखंड दान करा :** शनिवारी लोखंडाचे भांडे किंवा वस्तू दान केल्याने शनी दोष दूर होतो.

# शनिकथा व इतिहास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या दैनंदिन जीवनात तेजपुंज आणि शक्तिशाली शनीचे आगळे वेगळे महत्व आहे. तसेच शनी सौर जगतातील नऊ ग्रहांमधील सातवा ग्रह आहे. याला ज्योतिष शास्त्रात अशुभ मानले जाते. आधुनिक खगोल शास्त्रानुसार शनीचे पृथ्वीपासूनचे अंतर जवळपास नऊ कोटी मैल आहे. याचा व्यास १ अब्ज ४२ कोटी ६० लाख किलोमीटर इतका आहे. शनिची गुरुत्वाकर्षण शक्ती पृथ्वीच्या ९५ पट अधिक आहे. शनीला सूर्याभोवती प्रदक्षिणा घालण्यासाठी १९ वर्षे लागतात. अंतराळात शनि गर्द, निळसर , प्रकाशमान , सुंदर बलशाली दिसतो. पृथ्वीला जसा चंद्र एक उपग्रह आहे तसे शनीभोवती २२ उपग्रह आहेत.

शनिची गुरुत्वाकर्षण शक्ती पृथ्वीपेक्षा अधिक असल्यामुळे आपल्या मनात जो काही विचार येतो, ज्या कल्पना, योजना आखतो त्याची चांगली अथवा वाईट चुंबकीय शक्तीने शानिपर्यंत पोहचते. फलस्वरूप चांगल्याच परिणाम चांगला वाईटाचा परिणाम वाईट तत्काळ दिसून येतो. वाईट प्रभावाला फलज्योतिष मध्ये अशुभ मानलेले आहे , तर चांगल्याचा परिणाम शुभ मानला आहे.म्हणून आपण शनीला शत्रु नाही मित्र समजावे अन्यथा वाईट कामाबद्दल आपल्यामागे आहे. संकटे



आहेत शत्रुत्व आहे.
श्री शनिदेवाची जन्मगाथा उत्पत्ती संदर्भात वेगवेगळ्या कथा आहेत. श्री शनिदेवाची सर्वात प्रचलित उत्पत्ती गाथा स्कंध पुराणातील काशी खंडात अशा प्रकारची आहे.श्री शनैश्वरच्या वडिलांचे नाव सूर्यदेव व आईचे नाव संज्ञा होते. संज्ञा ही ब्रम्हदेवाचा पुत्र दक्ष प्रजापती याची कन्या होती. संज्ञा ही फारच स्वरूपान व रुपवती कन्या होती. दक्षाने आपल्या कन्येचे लग्न सूर्याशी करून दिले. संज्ञा सूर्यदेवाचे तेज सहन करू शकत नव्हती. संज्ञेला असे वाटत होते की , मी स्वताच तपश्चर्या करून तेज वाढवावे म्हणजे सूर्याचे तेज सुसह्य होईल.परंतु सूर्याची ती पतिव्रता नारी होती.सूर्यामुळे संज्ञेला तीन अपत्य झाली १) वैवस्वत मनु २) यमराज ३) यमुना

संज्ञा आपल्या मुलांवर खूप प्रेम करीत होती , परंतु सूर्याचे तेज सहन करू शकत नव्हती. एके दिवशी संज्ञाने विचार केला की सूर्यापासून वेगळे होऊन आपल्या माहेरी जाऊन तिथे तपश्चर्या करू अन् तिथेही विरोध झाला तर दूर कुठे तरी एकतांत जाऊन तपश्चर्या करून प्रथम संज्ञाने आपल्या तपश्चर्येने आपल्या सारख्याच दिसणाऱ्या एका छायेची निर्मीती केली जिचे नाव सुवर्णा ठेवले.सुवर्णाला आपल्या मुलांची जबाबदारी सोपवताना संज्ञा म्हणाली.
"सुवर्णा आजपासून माझ्या ऐवजी तू नारी धर्म संभाळ , अन् माझ्या मुलाबाळांचे पालन पोषण तू स्वतः कर. हे करताना जर काही अडचण आली, तर मला बोलव, मी लगेच येईन , पण एक गोष्ट लक्षात ठेव तू सुवर्णा आहेस संज्ञा नाहीस हे रहस्य कुणालाही कळता कामा नये."
संज्ञा सुवर्णाला आपली जबाबदारी सोपवून माहेरी निघून गेली. घरी गेल्यावर वडिलांना घडलेली सर्व हकीकत सांगितली. ऐकताच वडिलांनी संज्ञाला रागवून फटकारले की " न बोलविता मुलगी जर माहेरी आली तर तो दोष पिता-पुत्रीला लागतो. म्हणून तू लगेच आपल्या सासरीसूर्याजवळ जा"..
संज्ञा मनात विचार करायला लागली की जर मी परत गेले तर माझ्या छाया सुवर्णाला जे कर्तव्य सोपविलेले आहे त्याचे काय होणार ? ती कुठे जाणार ? शेवटी आमच्यातले रहस्य बाहेर येणार. शेवटी ती निब्बिड वनात जो उत्तर कुरुक्षेत्र आहे तिथे शरण गेली. आपल्या सौदर्यांची व यौवनबद्दल तिला भीती वाटत होती. म्हणून तिने " बडवा घोडी " रूप धारण केले ज्या मुळे तिला कुणी ओळखणार नाही. मग ती तपश्चर्याला लागली.

इकडे सूर्य व छाया सुवर्णा ला तीन मूले झाली. पती पत्नी एकमेकाबरोबर खूप प्रेम करीत. त्यामुळे सूर्याला शंकेचे कारणच नव्हते. यांच्या मुलांची नावे अशी १) मनु २) श्री शनीदेवा ३) पुत्री भद्रा ( तपती )

श्री शनिदेवाच्या उत्पत्ती संदर्भात दुसरी कथा अशी की, श्री शनिदेवाची निर्मीती महर्षी कश्यपच्या यज्ञातून झाली. जेव्हा शनि छाया सुवर्णाच्या गर्भात होता तेव्हा शिव भक्तीने सुवर्णा ने शिवाची इतकी तपश्चर्या केली की, ती आपले खाण पिणे सुद्धा विसरून जात असे. तिच्या अशा तपश्चर्येमुळे गर्भातच शनीचा रंग काळा झाला. शनीचा जेव्हा जन्म झाला तेव्हा सूर्यदेव शनीचा काळा रंग पाहून हैराण झाले. सुर्याला सुवर्णाची शंका आली, अन् लगेच सूर्याने सुवर्णाचा अपमान करीत सांगितले की हा मुलगा माझा नाही.
श्री शनिदेवाच्या अंगात जन्मतः आईच्या तपश्चर्या शक्तीचे बळ होते. त्यांनी पहिले की माझे वडील आईचा अपमान करीत आहेत. त्यांनी क्रूर नजरेने पित्याकडे पाहिले, पाहताच त्यांच्या वडिलांच्या शरीराचा रंग सुद्धा काळा झाला. घोडे चालण्याचे थांबले , रथ पुढे चालू शकला नाही, हैराण झालेल्या सूर्यदेवाने शिवाची आराधना सुरु केली, तेव्हा शिवाने सुर्याला सल्ला दिला की, तुमच्या कडून मुलगा व स्त्री दोघांचाही अपमान झाला. यामुळे दोष लागला. लगेच मग सूर्यदेवाने माफी मागितली. परिणामी पुन्हा सूर्यदेवाला सुंदर रूप प्राप्त झाले, व घोडे चालायला लागले. तेव्हापासून श्री शनिदेव वडिलांचे विद्रोही , शिवचे भक्त व माता यांना प्रिय आहे. जनमानसात असे समजतात की सूर्यमालेत जो शनि आहे, तोच श्री शनिदेवाचे प्रतिक आहे. शनिग्रह दगड व लोखंडापासून बनलेला आहे ज्याच्या वरती बर्फाचा थर व द्रवरूप हायड्रोजन मात्रा आहे. शनीचे तेजोवलय ६२००० की.मी. रुद्र व स्थूल रुपाने १०० मीटर आहे.

आपल्या दैनंदिन जीवनात आपल्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत शनीचे प्रभुत्व आपल्यावर आहे. बाळाचा जन्म होताच कुटुंब सदस्यांना वाटते की, आई वडिलांच्या किंवा बाळाच्या राशीत शनि कसा आहे. ? कुठल्या पायाने मुलाचा जन्म झाला आहे. यावरून ही शनीच्या शुभाशुभ फळावरून चांगला वाईट ची ओळख करतात. आपल्या शरीरात लोह तत्वाचा स्वामी शनि आहे. शनि कमजोर , दुर्लब झाल्यास शनीचा प्रकोप, शनिची पिडा यावरून शरीरात लोहाची कमतरता समजावी. लोह तत्वाच्या कमतरतेमुळे शरीरात अनेक प्रकारच्या व्याधी व्यक्तीला दुर्बल ( कमजोर), अशक्त करतात. आयहर म्हणजे शरीरातील उर्जा शक्ती, आयहर-विना शरीरातील उर्जा समाप्त होते. ज्याचा शनि प्रबळ आहे त्याला लोह तत्वाची कमतरता भासत नाही.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)